पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे-४११००७.

दूरध्वनी क्र.०२० - २५६०१२०४
प्रति. - २५६०१२९९
मॅनेज/लॉ/वि.श.- २५६०१२१६
आर्टस - २५६०१२१३
सायन्स-२५६०१२१४/कॉमर्स-२५६०१२१५
फार्मसी/मेडिकल - २५६०१२१०

परीक्षा विभाग
टेलिग्राम : "युनिपुणे"
फॅक्स - ०२० - २५६०१२०४
फॅक्स - ०२० - २५६०१२०८
वेबसाईट:www.unipune.ernet.in
वेबसाईट:www.unipune.ac.in
ई-मेल : coe@unipune.ernet.in

संदर्भ :– परीक्षा/वाणिज्य/४९७८ दिनांक : २५/२/२०११

मा. प्राचार्य,
सर्व संलग्न वाणिज्य महाविद्यालये,

**विषय :–** एम.कॉम. (सेमिस्टर – १ आणि ३) डिसेंबर २०१०
,परीक्षेच्या निकालाबाबत...

महोदय/महोदया,

एम.कॉम. (सेमिस्टर – १आणि ३) २००८ पॅटर्न डिसेंबर २०१० मध्ये घेतलेल्या परीक्षेचा निकाल दिनांक २६/०२/२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता जाहीर करण्यात येत आहे. परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे महाविद्यालयात वितरीत करण्यात येतील.

१. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील महविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल दिनांक २६/०२/२०११ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत घेऊन जावयाचे आहे.

२. अहमदनगर व नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांचा निकाल संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून दिनांक २६/०२/२०११ रोजी दुपारी ११.०० ते २.०० या वेळेत घेऊन जावयाचे आहे.

आपल्या महविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्यामुळे विद्यापीठामध्ये निकाल विचारण्यासाठी अथवा इतर चौकशी करण्यासाठी विद्यार्थ्यांना यावे लागणार नाही. त्याचप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्याच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास, विद्यार्थ्याला परस्पर विद्यापीठात न पाठविता महाविद्यालयाच्या प्रतिनिधी मार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. यानंतर त्यातील दुरूस्त्या त्वरीत करून घेण्याबाबत कार्यवाही करता येईल.

आपणांस विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेऊन जाण्याची व वितरीत करण्याची व्यवस्था करावी.

एम.कॉम. सेमिस्टर २ आणि ४ एप्रिल/मे २०११ मध्ये होणा–या परीक्षेचे परीक्षा अर्ज खालील प्रमाणे भरून विद्यापीठाकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी ही विनंती.

**विनाविलंब शुल्क दिनांक. ९/३/२०११,**
**विलंब शुल्कासहित दिनांक. १७/३/२०११**

कळावे,

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक